शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न शासकीय, अशासकीय अनुदानित/
विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत डॉ. धनराज माने शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे -१ यांचे जा. क्र. उशिसं/शिष्य-१९-२०/डीबीटी/२८९५/२८९६ दि. २६ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या पत्रानुसार विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन अर्ज भरणेसाठी दि. २९.०२.२०२० पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालयाच्या स्तराववरुन पडताळणी करणेसाठी दि. ०८ मार्च, २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे, याबाबतचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 520
दि. 28 FEB 2020

d:\2019\mangutkar\circular.docx

महाराष्ट्र शासन
विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण),कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४
E-mail: jdhekop@gmail.com/jdhekopscholarship२@gmail.com
फोन नं. (०२३१) २५३५४००/२५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००

जा.क्रं.विससं/उशि/कोवि/शिष्य/२०२०/ 730 दिनांक :२७/०२/२०२०

प्रति,

१. कुलसचिव,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

२. प्राचार्य,
शासकीय,अनुदानित,विनाअनुदानित कला,वाणिज्य,विज्ञान,
विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालय,कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

विषय:- उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबावत.

संदर्भ:- १.संचालनालयाकडील पत्र क्र.उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१३४०/दि.१/२/२०२०
२.संचालनालयाकडील ईमेल दि.०६.०२.२०२०
३.या कार्यालयाकडील पत्र क्र.विससं/उशि/कोवि/शिष्य/२०१९/५७३/दि.६/०२/२०२०
४. या कार्यालयाकडील पत्र क्र.विससं/उशि/कोवि/शिष्य/२०१९/५९०/दि.७/०२/२०२०
५.संचालनालयाकडील ईमेल दि.२५.०२.२०२०
६.संचालनालयाकडील पत्र क्र.उशिसं/शिष्य/२०१९-२०/डीबीटी/२८९६/दि.२६/२/२०२०

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, सन २०१९-२० मधील महाडीबीटी पोर्टलमध्ये विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याची अंतिम मुदत ही **दि.२९.०२.२०२०** अशी वाढविण्यात आलेली असून यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**सोबत दिलेल्या डॅशबोर्डनुसार** महाविद्यालयांनी संस्था स्तरावरती प्रलंबीत असणारे अर्ज तात्काळ फॉरवर्ड करणे आवश्यक असून अर्ज पडताळणीची अंतिम मुदत **दि.०८.०३.२०२०** अशी आहे.सदर अर्ज संस्था स्तरावरती प्रलंबीत राहिल्यास मुदत संपल्यानंतर आपोआप रिजेक्ट होतात याची दक्षता घेऊन तात्काळ अर्ज RO लॉगिनला फॉरवर्ड करणे आवश्यक आहे.सोबत संचालनालयाकडील पत्र जोडले आहे त्याचे योग्य ते अवलोकन करून आपल्या स्तरावरून कार्यवाही करण्यात यावी.

**विभागीय सहसंचालक,**
**(उच्च शिक्षण)**
**कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**

**सोबत- डॅशबोर्ड रिपोर्ट**
**प्रत:- मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,पुणे-०१**

Scanned by CamScanner

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य.१९-२०/डीबीटी/ 2895 दि. २६.०२.२०२०

**तात्काळ ईमेलद्वारा**

26 FEB 2020

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

विषय :- उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणे बाबत...

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. स्कॉलर-४९१७/प्र.क्र.१४६/मशि-२, दि. ०२/०८/२०१७
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७/१०/२०१७
३. शासन निर्णय क्र. मातंस-२०१८/प्र.क्र. १३८/से-१/३९, दि. १२.१०.२०१८
४. संचालनालयाचे दि. ३०.०७.२०१९, दि. ३१.०७.२०१९, दि. ९.०८.२०१९, दि. २०.०८.२०१९, दि. ७.१०.२०१९, दि. १५.१०.२०१९, दि. १.११.२०१९, दि. ४.११.२०१९, दि. ६.११.२०१९, दि. १३.११.२०१९, दि. १६.११.२०१९, दि. २६.११.२०१९, दि. १२.१२.२०१९, दि. १८.१२.२०१९, दि.२३.१२.२०१९ दि. २३.१२.२०१९, दि.१५.०१.२०२०, दि.२७.०१.२०२०, दि.०१.०२.२०२०, दि. ०६.२.२०२०, दि. ७.२.२०२०, दि.१५.२.२०२०, दि १८.२.२०२० व दि. २४.०२.२०२० रोजीचे पत्र.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. विद्यार्थी / महाविद्यालयांच्या मदतीसाठी डीबीटी पोर्टलवर व्हिडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच संदर्भिय संचालनालयाच्या पत्रान्वये वेळोवेळी लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना तसेच इतर शिष्यवृत्तीसाठी सन २०१९-२० करीता प्राप्त झालेल्या अर्जांचे प्रमाण हे मागील वर्षीच्या तुलनेत कमी असल्याचे निदर्शनास आल्यामुळे, ज्या पात्र विद्यार्थ्यांनी अद्यापही शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज भरलेले नाहीत अशा **विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन अर्ज भरणेसाठी दि. २९.०२.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरच्या मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही.** तरी अंतिम मुदतीची वाट न पाहता, शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना शक्य तितक्या लवकर महाडीबीटी पोर्टलवरुन अर्ज भरणेबाबत त्यांचे महाविद्यालयामार्फत कळविण्यात यावे.

तसेच महाविद्यालयाच्या स्तरावरुन विद्यार्थ्यांना त्रृटीपूर्ततेसाठी परत (Sent back to applicant) केलेले अर्ज, विद्यार्थ्यांनी त्रृटीपूर्तता करुन पुनःश्च Re apply करणे आवश्यक आहे. मुदतीनंतर सदरचे अर्ज आपोआप रिजेक्ट होतात. तरी याबाबत महाविद्यालयांनी विशेष कार्यशाळा आयोजीत करुन त्यांचे महाविद्यालयामधील शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरणेबाबत सहाय्य करण्यासंबंधी आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात. जेणेकरुन एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही.

तसेच महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची **महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. ८ मार्च, २०२० तसेच विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. १५ मार्च, २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.**

तरी महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्तीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आपल्या स्तरावरुन करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल संचालनालयास त्वरीत सादर करावा.

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

**web: www.dhepune.gov.in** **E-mail: schol.dhepune@gov.in**

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११५३


क्र.उशिसं/शिष्य.१९-२०/डीबीटी/2896 दि. २६.०२.२०२०

**तात्काळ ईमेलद्वारा**

26 FEB 2020

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित,
विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये.

विषय :- उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणे बाबत...

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. स्कॉलर-४९१७/प्र.क्र.१४६/मशि-२, दि. ०२/०८/२०१७
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७/१०/२०१७
३. शासन निर्णय क्र. मातंस-२०१८/प्र.क्र. १३८/से-१/३९, दि. १२.१०.२०१८
४. संचालनालयाचे दि. ३०.०७.२०१९, दि. ३१.०७.२०१९, दि. ९.०८.२०१९, दि. २०.०८.२०१९, दि. ७.१०.२०१९, दि. १५.१०.२०१९, दि. १.११.२०१९, दि. ४.११.२०१९, दि. ६.११.२०१९, दि. १३.११.२०१९, दि. १६.११.२०१९, दि. २६.११.२०१९, दि. १२.१२.२०१९, दि. १८.१२.२०१९, दि.२३.१२.२०१९ दि. २३.१२.२०१९, दि.१५.०१.२०२०, दि.२७.०१.२०२०, दि.०१.०२.२०२०, दि. ०६.२.२०२०, दि. ७.२.२०२०, दि.१५.२.२०२०, दि १८.२.२०२० व दि. २४.०२.२०२० रोजीचे पत्र.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. विद्यार्थी / महाविद्यालयांच्या मदतीसाठी डीबीटी पोर्टलवर व्हिडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच संदर्भिय संचालनालयाच्या पत्रान्वये वेळोवेळी लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना तसेच इतर शिष्यवृत्तीसाठी सन २०१९-२० करीता प्राप्त झालेल्या अर्जांचे प्रमाण हे मागील वर्षीच्या तुलनेत कमी असल्याचे निदर्शनास आल्यामुळे, ज्या पात्र विद्यार्थ्यांनी अद्यापही शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज भरलेले नाहीत अशा **विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन अर्ज भरणेसाठी दि. २९.०२.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरच्या मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही.** तरी अंतिम मुदतीची वाट न पाहता, शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना शक्य तितक्या लवकर महाडीबीटी पोर्टलवरुन अर्ज भरणेबाबत कळविण्यात यावे.

तसेच महाविद्यालयाच्या स्तरावरुन विद्यार्थ्यांना त्रृटीपूर्ततेसाठी परत (Sent back to applicant) केलेले अर्ज, विद्यार्थ्यांनी त्रृटीपूर्तता करुन पुनःश्च Re apply करणे आवश्यक आहे, याबाबत संबंधित विद्यार्थ्यांना माहिती देण्यात यावी.

मुदतीनंतर सदरचे अर्ज आपोआप रिजेक्ट होतात. तरी याबाबत महाविद्यालयांनी विशेष कार्यशाळा आयोजीत करुन त्यांचे महाविद्यालयामधील शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरणेबाबत सहाय्य करावे. जेणेकरुन एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही.

तसेच महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची **महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. ८ मार्च, २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.** महाविद्यालय स्तरावरुन अर्जांची पडताळणी करणेसाठी ही शेवटची संधी देण्यात आलेली असून, यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. मुदतीनंतर प्रलंबित राहीलेले अर्ज सिस्टीमद्वारे आपोआप रिजेक्ट होतात. त्यामुळे आपल्या स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्जांची तात्काळ पडताळणी करावी.

विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीबाबतची माहिती न मिळाल्यामुळे तसेच विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे भरलेले अर्ज पडताळणीसाठी महाविद्यालयांच्या स्तरावर पडताळणीसाठी मुदतीनंतरही प्रलंबित राहील्यामुळे पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास याबाबत संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य जबाबदार राहतील. याची नोंद घ्यावी.

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

Gmail

Joint Dierctor Higher Education Kolhapur <jdhekop@gmail.com>

# हाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी महाविद्यालय तसेच विभाग स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्जाची पडताळणी मुदतीमध्ये पूर्ण करणेवाबत.

1 message

**DHE Pune scholarship** <schol.dhepune@gov.in> Tue, Feb 25, 2020 at 11:05 AM
To: jdheamt@yahoo.com, jdheaur_2007@rediffmail.com, jdhe_jal@yahoo.co.in, jdhekop@gmail.com, jdhemumbai@gmail.com, jdhengp@rediffmail.com, jdhe.nanded@yahoo.co.in, jtdire.1115@gmail.com, jdhepune@gmail.com, jtdirhesol@rediffmail.com, mrathod0111@gmail.com, pilludixit@gmail.com, jdhemum.dhepune@nic.in, JDHE Nanded <jdhe.nanded-mh@gov.in>, sanjujagtap82@gmail.com, valvi.ganesh4@gmail.com, akshdby@gmail.com, ganesh_patil_1982@yahoo.co.in, sachin.pawar1109@gmail.com, 24mayuresh@gmail.com, shivsharanrs@gmail.com, deorehemant.9421@gmail.com, rathodrama7@gmail.com

Dear sir / madam

Please find attached report and instruct concerned to complete pending application scrutiny on time.

Directorate of Higher Education
DBT Scheme wise Application status A.Y. 2019-20
DBT Dashboard [Last Report Updated: 25/02/2020 05:09:46]

| Sr. No. | Division | Application Received | Approved By Institute | Pending At Institute | Approved By Department | Cancelled | Pending At Department | Rejected | Sent back to applicant | Pending At Institute (2nd Installment) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Amravati | 7,608 | 5,251 | 688 | 5,025 | 806 | 226 | 390 | 473 | 601 |
| 2 | Aurangabad | 41,487 | 31,543 | 2,373 | 31,444 | 4,722 | 99 | 1,334 | 1,515 | 3,810 |
| 3 | Jalgaon | 8,162 | 5,556 | 940 | 5,500 | 699 | 56 | 581 | 386 | 543 |
| 4 | Kolhapur | 49,807 | 42,546 | 1,338 | 41,516 | 3,301 | 1,030 | 514 | 2,108 | 3,044 |
| 5 | Mumbai | 2,521 | 1,401 | 243 | 1,385 | 504 | 16 | 130 | 243 | 130 |
| 6 | Nagpur | 8,241 | 6,306 | 345 | 6,272 | 980 | 34 | 215 | 395 | 493 |
| 7 | Nanded | 25,482 | 18,791 | 1,232 | 18,541 | 2,588 | 250 | 1,410 | 1,461 | 2,082 |
| 8 | Panvel | 5,415 | 3,644 | 493 | 3,375 | 700 | 269 | 144 | 434 | 176 |
| 9 | Pune | 53,511 | 41,699 | 1,412 | 41,395 | 5,875 | 304 | 2,104 | 2,421 | 3,808 |
| 10 | Solapur | 13,069 | 10,583 | 406 | 10,189 | 1,052 | 394 | 244 | 784 | 1,149 |
| | Out of Maharashtra | 14 | 10 | 2 | 10 | 1 | 0 | 1 | 0 | 1 |
| **Grand Total** | | 2,15,317 | 1,67,330 | 9,472 | 1,64,652 | 21,228 | 2,678 | 7,067 | 10,220 | 15,837 |

Scanned by CamScanner